Exh-5

नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब सि.डी.

रे.मु.न. यांचे कोर्टात

651/२०२५ वादी

कु.स्नेहल जयराम अनारसे

प्रतिवादी

बबन गणपत अनारसे वगैरे

**याकामी वादी कडुन प्रतिवादी नं १ व २ याचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्या करीता अर्ज़ असे तो खालील प्रमाणे.**

सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपाचा व तदनुषंगाने मनाई हुकुम मिळण्या करीता दाखल केलेला आहे दावा मिळकत (अ) मौजे हंडीनिमगांव येथील शेत ज़मीन मिळकत

| गट नंबर | क्षेत्र | | आकार | | चर्तुसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हे | आर | रु | पैसे | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ४८/१/१ पै | १ | ३७ | ३ | ५६ | रेकॉर्ड प्रमाणे | | | |

दावा मिळकत (ब) मौजे भानसहिवरा येथील शेत जमीन मिळकत

| गट नंबर | क्षेत्र | | आकार | | चर्तुसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हे | आर | रु | पैसे | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| २६/२/क | १<br>ख | ७६<br>०८ | ४ | २० | रेकॉर्ड प्रमाणे | | | |
| २६/२/ब | १ | ७५ | ४ | २० | रेकॉर्ड प्रमाणे | | | |
| २६/२/अ | १ | ७५ | ४ | २० | रेकॉर्ड प्रमाणे | | | |

Filed on 1 AUG

Superintendent
S.D.Court,Newasa

दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित व एकत्र हिंदु कुटुंबाच्या खरेदी मालकीच्या आहेत.वादीचे वडील जयराम बबन अनारसे हे दि.१३/१०/२०२० रोजी मयत झालेले असुन वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये आपसात सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही.वादीचे वडील जयराम हे हयात असतांना कुटुंब व्यवस्था म्हणुन घरातील सर्व प्रमुख सदस्यांच्या नांवे जमीनी करण्यात आल्या होत्या.परंतु त्यांचया मध्ये आपसात कायदेशीर सरस निरस मानाने झालेले नव्हते व नाही.त्यातच वादीच्या वडीलांचा कोरोना काळात कोरोना आजाराने मृत्यु झाल्याने वादी व प्रतिवादी नं ४,६ व ७ हे अनाथ व निराधार झालेले होते व आहे.वादीच्या वडीलांचा मृत्यु झाल्यामुळे प्रतिवादी नं १ते३ हे एकमिलाफी झाले असुन ते वादी व तिच्या कुटुंबाला त्यांच्या कायदेशीर हिश्या प्रमाणे व हक्का पासुन वंचित ठेऊ पहात आहेत व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालु आहेत.

वादीचे वडील मयत झाल्यामुळे वादीचे कुटुंब हे प्रतिवादी नं १ ते ३ यांना धरुन प्रतिवादी नं १ च्या नांवावर असलेल्या मिळकती मध्ये वस्ती करुन रहात आहेत.वादीचे वडील मयत झाल्यानंतर वादीची आजी प्रतिवादी नं २ ही वादीच्या कुटुंबा सोबत व प्रतिवादी नं १ हे प्रतिवादी नं ३ च्या कुटुंबा सोबत रहात होते.परंतु दोन ते अडीच वर्षाने प्रतिवादी नं १ व ३ यांनी प्रतिवादी नं २ हिस त्यांच्या कुटुंबा मध्ये घेवुन गेले.प्रतिवादी यांचा मुळ उद्देश हा वादी व तिच्या कुटुंबाचा संपूर्ण दावा मिळकती मध्ये असलेला हिस्सा बुडवणे हा असल्याने प्रतिवादी नं १ते३ हे एकमिलाफी झाले व प्रतिवादी नं १ते३ यांच्या नांवावर मिळकती असल्याचा गैरफायदा घेत वादीच्या कुटुंबाला कोणत्याही पुरुष सदस्य यांचा आधार नसल्याने प्रतिवादी नं १ते३ हे प्रतिवादी नं १ व २ यांच्या नांवावरील मिळकती परस्पर विक्री करण्याच्या तयारीत आहेत व त्या दृष्टीने त्यांनी गांवात विक्री बाबत सौदे बाजी चालु असल्याचे खात्री लायक बातमी वादी हिस मिळालेली आहे.त्यामुळे वादी हिने दि.२५/७/२०२५ रोजी प्रतिवादी यांना वादीचा दावा मिळकतीत असलेला अविभक्त वडीलोपार्जित हिस्सा वाटुन,विभागुन मागितला असता प्रतिवादी नं १ते३ यांनी वादी हिस सदर दावा मिळकती मधील असलेला वादीचा असलेला अविभक्त हिस्सा वाटुन विभागुन देण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला.व " आम्ही दावा मिळकत विकुन टाकणार आहोत,तुम्हांला काय

करावयाचे ते करा " असे म्हणुन दावा मिळकतीची विक्री करण्या बाबतची धमकी दिली.व दावा मिळकत वाटुन विभागुन देण्यास नकार दिला. प्रतिवादी नं १ व २ हे त्यांचे नांवावरील मिळकती हया विक्री केल्यास वादीचे न्याय हक्कावर गदा येईल व त्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होईल.

वादीस सकृत दर्शनी केस असुन न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे कारण दावा मिळकती हया वडीलोपार्जित असल्याने दावा मिळकती मध्ये वादीचा अविभक्त हिस्सा आहे.प्रतिवादी नं १ व २ यांचे विरुध्द मनाई हुकुम दिल्यास त्याचे काही एक नुकसान होणार नाही.उलट प्रतिवादी नं १ व २ यांनी त्यांचे नांवावरील मिळकतीचे हस्तांतर केल्यास वादीचे न्याय हक्कावर गदा येईल दाव्याचा न्यायशीर फैसला होण्यास बराच कालावधी लागणार आहे.

**वादीची विनंती की,**

प्रतिवादी नं १ व २ यांनी त्यांचे नांवे असलेल्या दावा मिळकतीचे ति-हाईत इसम यांना गहाण,दान,बक्षीस,विक्री,साठेखत,विसार पावती वगैरे प्रकारचे हस्तांतर करु नये व दावा मिळकतीवर कुठल्याही बॅकेचे अगर सोसायटीचे कर्ज बोजा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम प्रतिवादी नं १ व २ यांचे विरुध्द देण्यात यावा तरी अर्ज मंजुर व्हावा सोबत प्रतिज्ञापत्र दिले असे.

तारीख २८/७/२०२५

(signature)
वादी

(signature)
वादी तर्फे ॲड.

Heard counsel for plaintiff. Gone through record. It appears to me that before passing any order, it is necessary to hear defendants. Hence issue notice to defendants as to why ad-interim exparte T.I. claimed should not be granted against you R/O 12/8/25—

(signature)
5/8/25

o

Heard both counsel. Gone through record. Considering the facts and record and documents, it appears to me that in order to avoid multiplicity of proceeding, it would be just and proper to restrain def no. 1 & 2 from alienating the suit property or creating third party interest till next date. Hence def no. 1 & 2 are hereby temporarily restrained from alienating or creating third party interest in the suit property till next date only

20/01/26